“विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तू स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करणेबाबत”

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः डीबीटी-२०१६/प्र.क्र.९०/वित्त-९

बांधकाम भवन, १ ला मजला

२५, मर्झबान पथ, मुंबई ४०० ००१

दिनांक :- ०९ जानेवारी, २०१७

वाचा:-

१) **शासन निर्णय क्रमांकः** नियोजन विभाग शासन निर्णय, क्रमांक-डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दिनांक- ५ डिसेंबर,२०१६.

प्रस्तावना

नियोजन विभाग शासन निर्णय, क्रमाक-ङिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दि.०५ डिसेंबर, २०१६ अन्वये शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी शासनाद्वारे वस्तू स्वरुपात अनुदान देण्यात येते त्या ठिकाणी रोख रक्कमेच्या स्वरुपात अनुदान देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. सद्यस्थितीत नियोजन विभाग शासन निर्णय दि. ५ डिसेंबर, २०१६ च्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणीबाबत राज्यातील विविध जिल्हा परिषदांकडून या विभागाकडे मार्गदर्शन मागविण्यात येत आहे. तसेच विविध जिल्हा परिषदांकडून त्यांच्या स्वीय निधीमधून वस्तू स्वरुपात लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत योजना प्रस्तावित करुन त्यास मान्यता देण्याबाबत या विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने जिल्हा परिषदांच्या स्वीय निधीमधून राबविण्यात येणाऱ्या योजनांव्दारे लाभार्थ्यांना लाभ देण्यासंदर्भात खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय

जिल्हा परिषदेअंतर्गत २०% जिल्हा परिषद सेस निधीतून मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठी विविध कल्याणकारी योजनांमधून वस्तू स्वरुपात देण्यात येणारे अनुदान रोख रकमेच्या स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात देण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०१०९१३१४०७३२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Bhaskar Ringane

Digitally signed by Narayan Bhaskar Ringane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=54324e56f45e28f7831a436ed16f6ba60127e341b1d86d7995abbb40c8e85a9c, cn=Narayan Bhaskar Ringane
Date: 2017.01.09 17:30:51 +05'30'

(ना.भा.रिंगणे)
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२) मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
३) मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
४) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
५) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
६) मा. सचिव (ग्रा.वि.व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक
७) मा.विधान सभा / विधान परिषद सदस्य
८) महालेखाकार (स्थानिक संस्था) महाराष्ट्र-१, मुंबई (पाच जादा प्रतीसह)
९) महालेखाकार (स्थानिक संस्था) महाराष्ट्र-२, नागपूर (पाच जादा प्रतीसह)
१०) सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
११) संचालक तथा मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, म.रा. कोकण भवन, नवी मुंबई
१२) सर्व सहसचिव / उपसचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३) सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (कोकण/रत्नागिरी/पुणे/नागपूर/औरंगाबाद/अमरावती)
१४) सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१५) सर्व जिल्हा परिषदाचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
१६) सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८) वित्त विभाग (व्यय-१५ / अर्थ-१७/ वित्त आयोग कक्ष)
१९) ग्राम विकास व जलसंधारण विभाग (सर्व कार्यासने)
२०) निवडनस्ती (वित्त-९)